जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये स्वातंत्र्य सैनिकांचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.जीआयो २००८/प्र.क्र.२४१/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १० डिसेंबर, २००९

वाचा :- १) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. जिआयो १०९७/प्रक्र २४७/ आरोग्य-३, दिनांक ६ नोव्हेंबर, १९९७
२) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. जिआयो २००२/२६७/आ.३ दिनांक १० जुलै, २००६
३) शासन निर्णय क्र. जिआयो २००७/प्रक्र १२८/आ.६, दिनांक २ एप्रिल, २००८
४) दि. ५.८.२००८ च्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णय क्र. ७ (२)

प्रस्तावना :- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील दारिद्रय रेषेखालील रुग्णांना हृदयविकार, मुत्रपिंड विकार, मेंदू आणि मज्जासंस्थांचे विकार तसेच कर्करोग या आजारांवरील उपचार जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत करण्यात येत आहेत. सदर योजनेमध्ये स्वातंत्र्य सैनिकांचा/ त्यांच्या विधवांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील दारिद्रय रेषेखालील रुग्णांवर हृदयविकार, मुत्रपिंड विकार, मेंदू आणि मज्जासंस्थांचे विकार व कर्करोग या आजारांवरील शस्त्रक्रिया व उपचार जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत केले जातात. आता सदर योजनेमध्ये राज्यातील स्वातंत्र्य सैनिक /स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवांचा समावेश करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे क्रमांक २७१८/१४७२, दिनांक १९/११/२००९ व क्र. अनौसं क्र. ६१०/२००९/व्यय-१३, दिनांक ३/१२/२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ.सं.फडतरे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

कृ.मा.प.